झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,पुणे.
(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
चौथा मजला,काकडे बीझ् आयकॉन, ई-स्क्वेअरजवळ,
अशोकनगर, गणेशखिंड रोड, शिवाजी नगर, पुणे-४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (O) : ०२०-२५५७७९९९
ईमेल- : srapune@yahoo.in वेबसाईट: www.srapune.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

झोपुप्रा/तह-ताबा/१५८४/२०२१

दिनांक:- ३१/१२/२०२१

प्रति,

दुय्यम निबंधक अधिकारी

हवेली क्र. १ ते २८, पुणे.

विषय :- सि.स.नं. ५४, शिंदे प्लॉट, एरंडवणा गावठाण, पुणे या मिळकतीवरील वारस निश्चिती झालेल्या झोपडीधारकांचे करारनामे करणेबाबत.

संदर्भ :- १. दिनांक ०३/११/२०२१ रोजीची मा. मुख्य कार्यकारी अधिकारी झोपुप्रा, पुणे यांचेकडील मान्य टिपणी.

२. या विभागाकडील जा.क्र. झोपुप्रा/तह-ताबा/१३३७/२०२१, दि. ०३/११/२०२१ रोजीचे पत्र.

३. उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपुप्रा., पुणे यांचेकडील जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-२/एसआर/शिंदे प्लॉट/ वारस/११५/२०२१, दि. २७/१२/२०२१ रोजीचे निकालपत्र.

४. उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपुप्रा., पुणे यांचेकडील जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-२/एसआर/शिंदे प्लॉट/ वारस/११९/२०२१, दि. २९/१२/२०२१ रोजीचे निकालपत्र.

संदर्भ क्र. १ नुसार विषयांकित योजनेतील एकुण १० निवासी पात्र झोपडीधारकांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार १० निवासी सदनिकांचे वाटप करुन वारस निश्चिती शिल्लक राहीलेल्या ३ झोपडीधारकांचे वारस निश्चितीबाबतचे आदेश प्राप्त झालेनंतर करारनामा करणे व उर्वरित वाटप करणेत आलेल्या ७ निवासी झोपडीधारकांचे त्यांना प्राप्त सदनिकेप्रमाणे करारनामे करणेकरीता मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे यांची मान्यता मिळाली होती.

त्याअनुषंगाने संदर्भ क्र. २ नुसार आपणांस विषयांकित योजनेतील १० निवासी पात्र झोपडीधारकांपैकी ७ निवासी झोपडीधारकांचे करारनामे करणेकरीता पत्र निर्गमित करणेत आले होते.

मा. उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र. २, झोपुप्रा., पुणे यांनी संदर्भ क्र. ३ नुसार झोपडी क्र. ८ या ठिकाणी निवासी पात्र झोपडीधारक काशिराम बाबुराव मेंगे यांचे वारस म्हणून रेश्मा रमेश मेंगे यांचा समावेश करणेत येत आहे. तसेच संदर्भ क्र. ४ नुसार झोपडी क्र. ४ या ठिकाणी निवासी पात्र झोपडीधारक श्रीमती रुक्मिणीबाई वसंतराव गावडे यांचे वारस म्हणून श्रीकांत वसंत गावडे यांचा समावेश करणेत येत आहे. असा आदेश निकालपत्राद्वारे या विभागाकडे प्राप्त झालेला आहे.

त्याअनुषंगाने संदर्भ क्र. २ व ३ नुसार श्री. रमेश काशिनाथ मेंगे यांना प्राप्त सदनिका क्रमांक २०३ चा करारनामा श्री रमेश काशिनाथ मेंगे यांचे वारस श्रीमती रेश्मा रमेश मेंगे यांचे समवेत करण्यात यावा. तसेच श्रीमती रुक्मिणीबाई वसंतराव गावडे यांना प्राप्त सदनिका क्रमांक ५०२ चा करारनामा श्रीमती रुक्मिणीबाई वसंतराव गावडे यांचे वारस म्हणून श्रीकांत वसंत गावडे यांचेसमवेत करण्यात यावा.

तसेच सदर योजना विकसक मे. युनिटी कन्स्ट्रक्शन यांचे मार्फत राबविण्यात आलेली असलेने पात्र निवासी झोपडीधारकांसोबत करावयाचे करारनामे नोंदणीकृत करणेकामी विकसक मे. युनिटी कन्स्ट्रक्शन यांना झो.पु.प्रा. कार्यालयाच्या वतीने प्राधिकृत करण्यात येत असून, त्यास महाराष्ट्र वन व महसूल विभाग राजपत्र मंगळवार, मार्च ४, २००८/ फाल्गुन १४, शके १९२९ च्या तरतुदीनुसार मुद्रांक शुल्क सवलत देण्यात यावी.

V. S. Bhatkar

तहसिलदार (ताबा)
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.

प्रत:- विकसक मे. युनिटी कन्स्ट्रक्शन, सि.टी.एस. ३८३, सदाशिव पेठ,/ नवी पेठ, शिंदे हाईट, विठ्ठल मंदिराजवळ, न्यु इंग्लिश स्कुलच्या मागे, पुणे-३० यांना झोपडीधारकांचे करारनामे करुन ताबे देणेकरीता...